जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2025
सकाळ

# 'पदवी'सह करता येणार प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## शिवाजी विद्यापीठाने लागू केली 'एसओपी'

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २८ : पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सर्टिफिकेट कोर्स) देखील करता येणार आहे. त्याबाबतची चांगली संधी शिवाजी विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. या अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाने एसओपी (स्थायी संचालन प्रक्रिया) लागू केली आहे.**



कमी कालावधीत एखाद्या विषयाची माहिती, ज्ञान अथवा कौशल्य उपलब्ध करून देण्यात प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपयुक्त ठरतात. त्यादृष्टीने विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, लोकविकास केंद्र, दूरशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमध्ये विविध स्वरूपातील ९० हून अधिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू आहेत. त्यात औषधी वनस्पतींची ओळख, घरगुती उपकरणांची दुरुस्ती, बँकिंग (सहकारी), फॅशन टेक्नॉलॉजी, कम्युनिकेशन स्कील, फंक्शनल इंग्लिश अशा अभ्यासक्रमांचा समावेश आहे. गेल्या वर्षी या अभ्यासक्रमांना सुमारे तीन हजार ५०० विद्यार्थी प्रवेशित झाले होते. या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयांत हे अभ्यासक्रम राबविण्यात त्यामध्ये एकसूत्रीपणा राहावा या उद्देशाने विद्यापीठ प्रशासनाने 'एसओपी' लागू केली आहे. त्यामध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना एकाच वेळी त्या-त्या अभ्यासक्रमांसह प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठीदेखील प्रवेश घेता येणार आहे. या अभ्यासक्रमांसाठी लिव्हिंग, ट्रान्स्फर सर्टिफिकेटची आवश्यकता असणार नाही. दर तीन वर्षांनी अथवा त्यापेक्षा कमी कालावधीत आवश्यकतेनुसार हे अभ्यासक्रम सुधारित केले जाणार आहेत. 'एसओपी'मुळे या अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षण मिळणार आहे.

> विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांत विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. त्यात तीन ते सहा महिने कालावधीच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. ते अभ्यासक्रम राबविताना त्यात समानता, एकसूत्रीपणा राहावा, या उद्देशाने त्यांच्यासाठी 'एसओपी' लागू केली आहे. त्याबाबत अधिविभागप्रमुख, महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सूचना दिल्या आहेत.
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव**

> या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेत हे अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहेत. ते विद्यार्थ्यांना करिअरच्यादृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. लवकरच विद्यापीठातर्फे मोडी शिक्षक, निसर्गोपचार असे नवे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत.
> **- डॉ. आर. जी. पवार, आजीव अध्ययन व विस्तार विभाग**

### प्रमाणपत्रावर 'ग्रेडेशन' असणार

या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा जादा असणार नाही. ते पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना किमान चार श्रेयांक (क्रेडिट) मिळतील. संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रावर ग्रेडेशन असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2025
तरुण भारत

# क्रांतिअग्रणी लाड यांच्या कार्यावर संशोधन करावे

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्रांतिअग्रणी जी. डी. लाड यांच्या कार्याचे क्षितीज खूप विस्तीर्ण आहे. ते समजवून घेण्यासाठी निश्चितपणे संशोधनाचा विषय आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यावर संशोधन करावे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे भारतीय स्वातंत्र्यलढयातील थोर स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक क्रांतिअग्रणी जी. डी. लाड यांच्या नावे अध्यासन सुरू करण्यात आले. या अध्यासनाच्या शुभारंभप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमप्रसंगी आमदार अरूण लाड यांची प्रमुख उपस्थित होती. ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे यांनी क्रांतिअग्रणी जी. डी. लाड यांच्या जीवनावर मार्गदर्शन केले.

आमदार अरूण लाड म्हणाले, क्रांतिअग्रणी डॉ.जी. डी. लाड यांचे कार्य, चळवळ समाजापर्यंत पोहचले पाहिजे. त्यांच्या लढयातील वस्तुनिष्ठ इतिहास समाजापुढे आणावा. हा प्रमुख उद्देश अध्यासन केंद्राचा आहे. समाज हेच त्यांचे कुटुंब होते. स्वातंत्र्य लढयामध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिले. अन्याय, अत्याचार आणि दुष्टप्रवृत्तींच्या



■ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन

विरोधात ते नेहमी आक्रमक होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सरोज पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. क्रांतिअग्रणी जी. डी. लाड अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परियच करून दिला. डॉ. नवनाथ गुंड यांनी आभार मानले.

यावेळी सरपंच किरण लाड, लाड कुटुंबीय, व्यंकप्पा भोसले, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. माया पंडित, विश्वनाथ माळी, डॉ. जी. पी. माळी, माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे, शरद नावरे, प्राचार्य टी. एस. पाटील आदी उपस्थित होते.